I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S. (पोलीस ठाणे):** पालम **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0150 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/04/2026 00:45 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 08/04/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 08/04/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:01 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:04 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 09/04/2026 **Time (वेळ):** 00:45 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 09/04/2026 00:45 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामीण रुग्णालय, पालम , ता पालम जि परभणी येथील गेट , ता पालम जि परभणी,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): बाबासाहेब पाराजी थोरे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1981

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस अधीक्षक कार्यालय, , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , नांदेड , पालम, परभणी, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस अधीक्षक कार्यालय, , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , नांदेड , पालम, परभणी, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9923070123

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश दगडोबा खंदारे | | | 1. सामान्य रुग्णालय,परभणी,Town/Village (शहर / गाव): पार्वती नगर,रविराज पार्क,Tehsil (तहसील): वांगी रोड,परभणी,Police Station (पोलीस ठाणे): पालम,District (जिल्हा): परभणी,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक 09/04/2026

मी बाबासाहेब पाराजी थोरे, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 9923070123

सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी पोलीस अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील आठ महीन्यापासुन पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.

दिनांक 02/04/2026 रोजी मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परिक्षेत्र, नांदेड यांनी आम्हास आदेशीत केले की, परभणी येथे जावुन तक्रारदार नामे सय्यद अझर सय्यद नाजेम, मो.क्र.8421702221 यांची भेट घेवुन त्यांची लाचमागणी संबंधाने असलेली तक्रार ऐकुण घेवुन पुढील कार्यवाही करावी.

त्याप्रमाणे आम्ही दिनांक 02/04/2026 रोजी तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्यांनी सांगीतलेल्या ठिकाण न्यु मराठावाडा अर्बन को-आॅप केर डिट सोसायटी लि. दत्तनगर परभणी येथील कार्यालयात जावुन तक्रारदार सय्यद अझर सय्यद नाजेम यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांना त्यांचे तक्रार संबंधाने विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगीतले की, माझा भाउ सय्यद खिजर सय्यद नाजेम यांचे नांवे परिवर्तन लेबर काॅन्ट्रक्टर ॲन्ड मल्टी सव्हीस या नांवाने फर्म आहे. सदरील फर्मचे सर्व कामकाज मी पाहतो.

दिनांक 21/03/2026 रोजी ग्रामीण रुग्णालय, पालम, ता. पालम, जि. परभणी येथे स्वच्छता सेवासाठी टेन्डर मागविण्यात आले बाबत दै.गाववाला मध्ये जाहिरात प्रसिध्द झाली होती. ग्रामीण रुग्णालय पालम कडुन मागविण्यात आलेल्या स्वच्छता सेवा चे काम आमचे परिवर्तन लेबर का ॅन्ट्रक्टर ॲन्ड मल्टी सव्हीस या नांवाने टेन्डर मंजुर होणे कामी दिनांक 27/03/2026 रोजी कोटेशन सादर केले आहे.

सदरील कामाचे टेन्डर मिळणे कामी कोटेशन दाखल केल्यानंतर ग्रामीण रुग्णालय, पालम ता.पालम जि. परभणी येथील वैद्यकीय अधिक्षक श्री. रमेश खंदारे यांनी आमचे कोटेशन पास करण्यासाठी त्यांनी 50,000/- रुपये लाचेची मागणी करत आहेत.

सदर वैद्यकीय अधिक्षक श्री. रमेश खंदारे हे पैशाची मागणी करत असले बाबत मी भाउ सय्यद खिजर सय्यद नाजेम यांना सांगीतले. तेव्हा त्यांनी स्वच्छता सेवेचे टेन्डर पास करुन देण्यासाठी वैद्यकीय अधिक्षक श्री. रमेश खंदारे यांना पैसे देण्याची ईच्छा नसल्याचे सांगीतले. तसेच माझ्या भावाचे नांवे असलेला सदरील फर्मचे मी सर्व कामकाज पाहत असल्याने त्यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार देण्यास सांगीतले.

श्री. रमेश खंदारे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, पालम, ता.पालम, जि.परभणी यांनी परिवर्तन लेबर काॅन्ट्रक्टर ॲन्ड मल्टी सव्हीस या नावाने स्वच्छता सेवेचे टेन्डर मिळणे कामी सादर केलेले कोटेशन मंजुर करण्यासाठी माझेकडे 50000/- रुपय लाचेची मागणी केली असुन मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. त्यांच्याशी माझा पैसे देण्या घेण्याचा व्यवहार नाही. तसेच माझी त्यांचे सोबत पुर्व दुश्मनी नाही.

श्री. रमेश खंदारे, वैद्यकीय अधिक्षक यांची भेट घेण्यासाठी मी आज दिनांक 02/04/2026 रोजी जाणार आहे. त्यावेळी त्यांनी सदर कामासाठी माझेकडे पैशाची मागणी करुन त्यांनी स्वतः किंवा ईतरा मार्फत पैसे स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणेस विनंती आहे. तक्रारदार यांचे म्हणणे प्रमाणे त्यांचेकडुन त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहुन घेतली.

त्यानंतर पुढील गोपनिय कामाकरीता जिल्हा परिशद, परभणी येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक यांची भेट कुठे होईल या बाबत विचाराणा केली.

तेव्हा वैद्यकीय अधिक्षक कार्यालय पालम येथील कार्यालयामध्ये माझा अत्यंत जवळाचा व विष्वासु मित्र आहे. तो वैद्यकीय अधिक्षक श्री. रमेश खंदारे हे त्यांचे कार्यालयात हजर आल्यानंतर मला कळविणार आहे. मला मित्राने कळविल्यानंतर आपण परभणी येथुन निघुन ग्रामीण रुग्णालय पालम, ता.पालम जि. परभणी येथे जावुन लोकसेवक यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणीची कार्यवाही करावी. असे सांगीतले.

तक्रारदार सय्यद अझर सय्यद नाजेम यांचे मित्राने त्यांना कळविले की, श्री. रमेश खंदारे, वैद्यकीय अधिक्षक हे कार्यालयात येवुन गेले. परंतु त्यांनी तक्रारदार यांना बोलावले नाही. त्यामुळे सदर दिवशीची कार्यवाही तात्पुर्ती स्थगीत करुन शासकीय सुटीचे कारणास्तव पुढील दोन तीन दिवसानंतर पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर तक्रारदार यांनी सोमवार दिनांक 06/04/2026 रोजी आम्हास कळविले की, लोकसेवक रमेश खंदारे यांची तब्येत ठिक नसल्यामुळे ते दोन दिवस कार्यालयात येणार नाही. त्यामुळे आम्ही तक्रारदार यांचे म्हणणे प्रमाणे पुढील कार्यवाही दिनांक 08/04/2026 रोजी करण्याचा निर्णय घेतला होता.

त्याप्रमाणे आज रोजी आम्ही तक्रारदार यांचेशी संपर्क करुन नांदेड येथुन निघुन तक्रारदार नियोजित ठिकाणी न्यु मराठावाडा अर्बन को-आॅप क्रेडिट सोसायटी लि. दत्तनगर परभणी येथील कार्यालयात भेट घेतली. तेव्हा त्यांना विचारणा केली की, लोकसेवक रमेश खंदारे, वैद्यकीय अधिक्षक हे कुठे भेटतील तेव्हा त्यांनी सांगीतले की, मी तक्रारदार यांना वाॅटसअप द्वारे काॅल करुन त्यांचे भेटीचे ठिकाण निश्चीत करतो. तक्रारदार यांचे म्हणणे प्रमाणे लोकसेवक यांना वाॅटसअप द्वारे काॅल करुन बोलण्यास सांगीतले. तसेच तक्रारदार व दोन्ही पंच यांना तक्रारदार यांनी केलेला काॅल डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करुन घेण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्र.8421702221 वरुन लोकसेवक रमेश खंदारे यांचा मोबाईल क्र.9767191073 वर वेळ 11:40 वाजता वाॅटसअॅप द्वारे काॅल केला. तेव्हा लोकसेवक यांनी मी परभणीत आहे असे सांगुन तक्रारदार यांना अर्ध्या एक तासात काॅल करतो असे सांगीतले. तक्रारदार व लोकसेवक यांच्या मोबाईलद्वार झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करुन घेण्यात आले आहे.

त्यांनतर लोकसेवक रमेश खंदारे यांनी वेळ 12ः40 वाजता तक्रारदार यांना वाॅटसअप द्वारे काॅल करुन सांगीतले की, मी निघालो आहे. तेव्हा तक्रारदार यांनी भेटण्याची विनंती केली. तेव्हा लोकसेवक म्हणाले की, मला पोलीस स्टेशन येथे मिटींग आहे. त्यामुळे तुम्ही तिकडेच या तिथे निवांत बोलु असे म्हणाले. सदरील काॅल डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करुन घेण्यात आला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना कुठे बोलावले आहे अशी विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगीतले की, लोकसेवक हे मला त्यांचे पालम येथील वैद्यकीय रुग्णालय येथे येण्यास सांगत आहेत. त्यामुळे आम्ही पुढील कार्यवाही पालम येथे जावुन करण्याचा निर्णय घेतला.

यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणाहुन वेळ 12:45 वाजता तक्रारदार यांचेसह आम्ही स्वतः, दोन्ही पंच व पोशि/1631, शेख जिब्राईल असे तक्रारदार यांचे वाहन एम.एच.22 ए.एम.4867 या चार चाकी वाहनाने व सहायक अधिकारी श्री.अल्ताफ मुलानी, पोहेकाॅ/56 जगन्नाथ अनंतवार हे सापळा पथकाचे शासकीय वाहनाने चापोशि/2773, बालासाहेब अवचार यांचेसह एका पाठोपाठ एक वाहनाने

पालम कडे रवाना झालो. सर्व सापळा पथक ताडकळस मार्गे पालम पासुन सुमारे एक कि.मी. अंतर आलीकडे एक सुरक्षित ठिकाणी वेळ 13:30 वाजता पोहचलो.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 संतोश वाघमारे यांना लाचमागणी पडताळणी अनुशंगाने सुचना देवुन लोकसेवक यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी कामी पोशि/1631, शेख जिब्राईल यांचे करवी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर चालु करून देवुन वेळ 14:24 वाजता रवाना केले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. संतोश वाघमारे हे लोकसवेक रमेश खंदारे, वैद्यकीय अधीक्षक यांची त्यांचे पालम येथील ग्रामीण रुग्णालय येथे जावुन भेट घेवुन वेळ 16:15 वाजता सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 श्री संतोश वाघमारे यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, "मी व तक्रारदार अजहर असे लोकसेवक खंदारे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदाराचे कारने पालम शहरातील ग्रामीण रूग्णालयाजवळ तेथे रोडवर कार लावुन आम्ही दोघे पायी रूग्णालयामध्ये गेलो. तेथे आम्ही दोघे रूग्णालयातील एका कक्षात गेलो. सदर कक्षाचे आत टेबलवर डाॅ. आर.डी. खंदारे, वैद्यकीय अधिक्षक या नावाची पाटी होती. त्यावरून तेथे बसलेली व्यक्ती लोकसेवक खंदारे असल्याचे मला समजले. त्यावेळी लोकसेवकाने तक्रारदारास कशाने आले असे विचारले व माझे बाबत विचारणा करून मला माझे नाव विचारले असता मी त्यांना माझे नाव संतोश वाघमारे असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार आणि लोकसेवक खंदारे यांची तक्रारदार यांचे कामासंबंधाने चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदाराने आॅर्डर बाबत विचारणा केली असता लोकसेवकाने आताच आल्याचे सांगीतले. तसेच काही वेळाने संबंधीत क्लर्क कडुन आॅर्डर बनवुन घेण्यास तक्रारदारास सांगीतले. त्यामुळे मी व तक्रारदार लोकसेवक खंदारे यांचे कक्षाचे बाहेर येवुन थांबलो. सुमारे एक दिड तासाने कार्यालयातील एका सेवकाने आम्हाला लोकसेवक खंदारे बोलवत असल्याचे सांगीतले. तेंव्हा मी व तक्रारदार असे लोकसेवक खंदारे यांचे कक्षात जावुन खुर्चीवर बसलो. लोकसेवकाने त्यांचे कार्यालयातील काम करणा-या व्यक्तीला त्यांचे कक्षात बोलावुन घेतले. सदर व्यक्ती याने तक्रारदाराचे कामाची आर्डर तयार करून आणली. त्यावर लोकसेवक खंदारे यांनी सही केली. सदर आदेषाची एक प्रत तक्रारदारास देवुन तक्रारदाराची सही घेवुन ती व्यक्ती तेथुन बाहेर निघुन गेली. त्यानंतर लोकसेवक त्यांचे खुर्चीवरून उठले व तक्रारदारास या असे म्हणाले तेंव्हा तक्रारदाराने मला सोबत येण्यास सांगीतले असता लोकसेवक खंदारे यांनी त्याला बस म्हणाव असे सांगीतले असता तक्रारदाराने उनकाच एक कन्फयुज दुर करणे का था असे सांगीतले. तेंव्हा लोकसेवक खंदारे तेथेच थांबले. त्यावेळी तक्रारदाराने त्यांना टक्केवारी जि.एस.टी. के साथ रहने वाली है या विदाउट जि.एस.टी. असे विचारले तेंव्हा लोकसेवकाने विदाउट जि.एस.टी. असे सांगीतले. तसेच तुमको जितना बिल निकलेगा उस हिसाबसे है वो असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने बिल समजो एक लाख अठरा हजार जिएसटी के साथ निकलींगा तो जिएसटी कटके बिस टक्के पकडनेकाना असे सांगीतले. तेंव्हा लोकसेवकाने जिएसटी छोड के ॲक्च्युअल पर जो अमाऊंट आराना उसके उपर असे तक्रारदारास सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने लोकसेवक खंदारे यांना सर वो पचास हजार बोले उसमे कुछ कम हुंगे क्या असे विचारले. तेंव्हा लोकसेवक खंदारे यांनी क्या होगा कम ज्यादा, सब तरफ वोच है, किसीकोबी पुच, ऐसा नई, लाया क्या असे म्हणाले. तेंव्हा तक्रारदाराने माझे कडे इशारा करून दस मिनट बात करता मै, कम नईच हुंगे क्या सर असे सांगीतले. तेंव्हा खंदारे यांनी अरे क्या, सि.एस. को उधर दिये लोगोने उनका कुछ रोल है क्या उसमे

असे तक्रारदारास म्हणाले. त्यावेळी लोकसेवक खंदारे यांनी ऐसा नई रेहता सब तरफ वईच है असे म्हणाले तेंव्हा तक्रारदाराने पच्चास हजार रूपये भोत होरे सर उसलीये बोलरा सर असे सांगीतले. तेंव्हा लोकसेवकाने मैं तुमको क्यों आॅर्डर देरा, तुमीच क्युॅ, ऐसा नई रेहता असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदाराने आप बोलो, आप को जो कम करने का है असे लोकसेवकास सांगीतले. तेंव्हा लोकसेवक खंदारे यांनी देव मोकळा होजाव चलो असे तक्रारदारास सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने पुन्हा एकदा पैसे कमी करण्याची विनंती केली असता लोकसेवक खंदारे यांनी नई भई पयलाच काम है, तुम ऐसा मत करो, किसी को भी पुच्छ के आओ असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने लोकसेवक खंदारे यांना पैसे कमी करण्याची पुन्हा विनंती केली. त्यावेळी लोकसेवकाने देव तुमको जो देना है, चलो यार टाईमपास मत करो असे तक्रारदारास सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने माझे कडे इशारा करून लोकसेवकास सांगितले की, पैसे मी देणार असुन आॅर्डरला पन्नास हजार रूपये द्यावे लागतील असे मला सांगीतल्याने तक्रारदाराने मला सोबत आणले आहे. तेंव्हा लोकसेवक खंदारे यांनी तुमको पयलेच दिन बोलाना, ऐसा थोडीच रेहता असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने लोकसेवकास सर चालीस दिंऊ क्या असे विचारले. त्यावेळी लोकसेवक खंदारे यांनी दे असे तक्रारदारास सांगीतले. तेंव्हा तकारदाराने एक दस मिनट असे म्हणुन लोकसेवकास वेळ मागुन घेतला व टेबलावर ठेवलेल्या वर्क आॅर्डरकडे पाहुन ये रहेने दिंऊ यहींच असे लोकसेवकास म्हणाले असता लोकसेवक यांनी तक्रारदारास नई लेके जा असे सांगीतले. त्यावर तक्रारदाराने लोकसेवकाच्या टेबलावर ठेवलेली आ ॅर्डर स्वतःजवळ घेतली. त्यानंतर मी व तक्रारदार तेथुन निघुन तक्रारदाराचे कार जवळ आलो व तेथुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. अषी हकीकत कथन केली. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 व 2 यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे लाचमागणी अनुशंगाने घडलेली हकीकत बाबत विचारणा केली असता. त्यांनी देखील पंच क्र.1 यांनी सांगीतल्याप्रमाणे हकीकत कथन केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक यांच्या भेटी दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता लाचमागणी पडताळणीत वैद्यकीय अधीक्षक रमेश खंदारे यांनी तक्रारदार यांचेकडे स्वच्छता सेवाचे कोटेशन पास करुन वर्क आॅर्डर देण्यासाठी 50,000/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती 40,000/- रू लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले. वैद्यकीय अधीक्षक रमेश खंदारे यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी करुन पैसे घेवुन येण्यास सांगीतल्याने लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

तक्रारदार यांनी पुढील सापळा कार्यवाहीसाठी लागणारी लाचेची रक्कम लोकसेवक वैद्यकीय अधीक्षक रमेष खंदारे यांना देण्याकरीता 40,000/- रुपये हजर केले. नमुद लाच रक्कम 40,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात अलगद ठेवून दिले. सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सर्व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही स्वतः, तक्रारदार, पंच क्र.1, पोहेकाॅ/56 जगन्नाथ अनंतवार, पोशी/1631, शेख जिब्राईल असे तक्रारदार यांचे वाहनाने व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहनाने ग्रामीण रुग्णालय पालम चे दिशेने रवाना झाले. आमचे वाहन ग्रामीण रुग्णालय पालमचे जवळ पोहचल्यानंतर आमचे सुचने प्रमाणे पोशि/1631, शेख जिब्राईल यांनी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर चालु करुन तक्रारदार यांचे जवळ वेळ 17:01 वाजता दिले. त्यानंतर तक्रारदार यांचे वाहन ग्रामीण रुग्णालयाचे गेट समोर उभे

केले. तेव्हा लोकसेवक डाॅ. रमेश खंदारे हे त्यांचे चार चाकी वाहनाने गेटचे बाहेर पडत असल्याचे तक्रारदार यांना दिसले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे तक्रारदार यांचे गाडीतुन उतरुन लोकसेवक यांचे कार जवळ पोहचले. तेव्हा लोकसेवक यांनी तक्रारदार यांना पाहुन त्यांची कार थांबविली. त्यानंतर तक्रारदार यांच्यात व लोकसेवक यांच्यात बोलणे झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टच्या खिषातील अॅन्थ्रासिन पावडर युक्त रक्कम काढुन लोकसेवक यांचे समक्ष धरली. तेव्हा तक्रारदार यांनी सदरील रक्कम कार मध्ये बसुन स्विकारली. तेव्हा लागलीच तक्रारदार यांनी लाच स्विकृती बाबतचा वेळ 17ः04 वाजता पुर्व नियोजित ईशारा दिला. तेव्हा आम्ही स्वतः व सर्व सापळा पथक तातडीने सर्तक होवुन लोकसेवक यांचे कार जवळ पोहचलो. लोकसेवक यांनी आम्ही येत असल्याचे पाहीले. त्यानंतर ते कार मधुन उतरुन बाहेर आले. त्यानंतर त्यांना लागलीच संषय आल्याने त्यांनी स्विकारलेले रक्कम फेकुन देवुन पळत सुटले. तेव्हा आम्ही त्यांना लगेचच पळत जावुन त्यांचे हात धरले. तेव्हा पंच क्र. 1 यांना लोकसेवक यांनी फेकलेली रक्कम उचलुन त्यांचे जवळ ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर लोकसेवक यांना त्यांचे कार्यालयात घेवुन गेलो.

सदर ठिकाणी यशस्वी सापळा कार्यवाही अनुशंगाने कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर पंच क्र.1 व तक्रारदार यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सापळा कार्यवाही दरम्यान काय हकीकत घडली या बाबत विचारपुस केली. तेव्हा पंच क्र. 1 व तक्रादार यांनी सांगीतले की, डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर चालु करुन दिल्यानंतर आम्ही दोघेजन ग्रामीण रुग्णालयाचे गेटचे आत गेलो. तेव्हा लोकसेवक हे त्यांचे कारने बाहेर जात होते. तक्रारदार हे लोकसेवक यांना निघालेले पाहुन म्हणाले "निकलरे क्या सर" तेव्हा लोकसेवक हे तक्रारदार यांचेकडे पाहुन म्हणाले "ईत्ता टाईम रहता क्या" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार म्हणाले साॅरी साॅरी, असे म्हणुन पंच क्र.1 यांचेकडे ईशारा करत बातचित कराथा असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे "दे फिर" असे म्हणुन लाचेच्या रक्कमेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टच्या खिशातील अॅन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्वतः उजव्या हाताने स्विकारुन पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यांनतर तक्रारदार यांनी लाच स्विकृती बाबतचा पुर्वनियोजित ईशारा केला. तेव्हा सर्व सापळा पथक सदर ठिकाणी हजर आले. अषी हकीकत कथन केली आहे.

त्यानंतर आम्ही लोकसेवक यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव डाॅ.रमेश दगडोबा खंदारे, वय 49 वर्शे, व्यवसाय नौकरी, पद वैद्यकीय अधिकारी, नेमणुक सामान्य रुग्णालय, परभणी चार्ज वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, पालम ता. पालम जि.परभणी. रा.पार्वती नगर, रविराज पार्क, वांगी रोड, परभणी ता.जि. परभणी असा परिचय दिला आहे.

आज दिनांक 08/02/2026 रोजी करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी, सापळा पुर्व कार्यवाही, सापळा कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

एकंदरीत नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार सय्यद अझर सय्यद नाजेम, व्यवसाय गुत्तेदारी, रा.इकबाल नगर, मदिना मस्जीद, परभणी ता.जि.परभणी यांचेकडे आज दिनांक 08/04/2026 रोजी करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार भाउ सय्यद खिजर सय्यद नाजेम यांचे नांवे असलेल्या परिवर्तन लेबर काॅन्ट्रक्टर अॅन्ड मल्टी सव्हीस या फर्मच्या नावाने स्वच्छता सेवेचे भरलेले टेन्डरचे कोटेशन पास करुन वर्क आॅर्डर देण्यासाठी 50000/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती 40000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे ग्रामीण रुग्णालय, पालम येथे

लोकसेवक यांचे विरुध्द सापळा आजमावण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान नमुद लोकसेवक यांनी पंचासमक्ष ग्रामीण रुग्णालय, पालम चे गेट जवळ त्यांचे कार मध्ये बसुन वेळ 17:04 वाजता तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारली आहे. म्हणुन लोकसेवक रमेश दगडोबा खंदारे, वय 49 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद वैद्यकीय अधिकारी, नेमणुक सामान्य रुग्णालय, परभणी चार्ज वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, पालम ता. पालम जि.परभणी. रा.पार्वती नगर, रविराज पार्क, वांगी रोड, परभणी ता.जि. परभणी यांचे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SHESHRAO KISANRAO KHATANE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** SHESHRAO KISANRAO KHATANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PBMAH53181

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन पालम